वर्ष : ०४ | अंक: ५२ | मुंबई, मंगळवार २० नोव्हेंबर २०१८ ते २६ नोव्हेंबर २०१८ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 मुंबईतील ४७ स्थानकांची सुरक्षा वाढवणार

3 → आढावा बैठका सफळ व्हाव्यात

२० डिसेंबरला निवासी डॉक्टर्सकडून रास्ता रोको आंदोलन ← 4




# मराठा आरक्षणावर मुंबई हायकोर्टात बुधवारी सुनावणी



**मराठा आरक्षणावर येत्या बुधवारी (दि.२१) मुंबई हायकोर्टात सुनावणी होणार आहे. त्याचबरोबर राज्य सरकारने यासंदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाच्या अहवालावर आपले म्हणणे मांडावे, असे आदेशही कोर्टाने दिले आहेत. मराठा आरक्षणाचा प्रश्न लवकर निकाली काढावा यासाठी विनोद पाटील यांनी सोमवारी सकाळी हायकोर्टात याचिका दाखल केली. ही याचिका दाखल करुन घेऊन न्या. धर्माधिकारी आणि न्या. कोतवाली यांच्या कोर्टाने यावर २१ नोव्हेंबर रोजी (बुधवारी) सुनावणी घेण्यात येईल असे सांगितले. राज्य सरकारकडे मराठा आरक्षणासंदर्भात आलेला राज्य मागास वर्ग आयोगाचा अहवाल याचिकर्त्यांनाही मिळावा अशी विनंतीही या याचिकेत करण्यात आली आहे.**

## मराठा बांधवांना SEBC प्रवर्गातून आरक्षण नको, ओबीसी फेडरेशनची भूमिका

मराठा बांधवाना SEBC प्रवर्गातून आरक्षण देण्यात येऊ नये अशी भूमिका ओबीसी फेडरेशनने घेतली आहे. त्यामुळे मराठा आरक्षण लागू होण्याआधीच वादाच्या भोवऱ्यात सापडण्याची शक्यता आहे. ओबीसी फेडरेशनची बैठक मुंबईतील आकाशवाणी आमदार निवासात पार पडली. या बैठकीला प्रकाश अण्णा शेंडगे, प्राध्यापक श्रावण देवरे, धोबी समाजाचे नेते बालाजी शिंदे, आमदार हरिभाऊ राठोड आणि विद्रोही कवी सचिन माळी यांची उपस्थिती होती. त्यामुळे आता मराठा आरक्षणाचे काय होणार? हा प्रश्न पुन्हा एकदा निर्माण झाला आहे.

मराठा आरक्षणासंदर्भात अहवाल देणारा मागासवर्ग आयोग घटनाबाह्य पद्धतीने नेमला गेल्याचा आरोपही या नेत्यांनी केला आहे. तसेच सर्वेक्षणासाठी नेमण्यात आलेल्या संस्था मराठा आणि ब्राह्मण समाजाशी संलग्न आहेत असाही आरोप ओबीसी फेडरेशनच्या नेत्यांनी केला आहे. या बैठकीत मराठा आरक्षणासंबंधीचे सगळे आक्षेप नोंदवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिणार असल्याचं या नेत्यांनी स्पष्ट केलं. त्यामुळे आता आरक्षणाचा मुद्दा या विरोधामुळे आणखी तापण्याची शक्यता आहे.

## मराठा समाजाला एसईबीसी प्रवर्गाअंतर्गत आरक्षणः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



मागासवर्गीय आयोगाचा अहवाल प्राप्त झाला असून मराठा समाजाला एसईबीसी (सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या मागास) प्रवर्गाअंतर्गत आरक्षण दिले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. हे आरक्षण देताना ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता स्वतंत्र कोट्यातून हे आरक्षण देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. राज्य मागासवर्गीय आयोगाने आपल्या अहवालात तीन शिफारशी केल्या आहेत. त्यात मराठा समाज हा शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्या मागास आहे. मराठा समाजाला आरक्षण द्यावे आणि अतिविशिष्ट परिस्थितीचा उल्लेख त्यांनी अहवालात केला आहे. या शिफराशी राज्य सरकारने स्वीकारल्या असल्याचे ते म्हणाले.

# मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत रिक्षावाल्याचा मनमानी कारभार

## रिक्षा युनियनने अतिरिक्त भाडे वाढवून प्रवाशांना केले बेजार



१ नोव्हेंबर रोजी रिक्षा युनियन च्या वतीने अचानक भाडेवाढ करुन प्रवासी व रिक्षा चालक यांच्यात वादविवाद पहायला मिळाले. यापूर्वी जवळजवळ ८९ स्टॅन्डवर शेअर रिक्षा भाडे वाढ १५ नोव्हेंबर २०१८ रोजी वाढवले होते. आता अचानक २५ टक्के भाडे रिक्षा युनियन च्या वतीने वाढवण्यात आले. नियमानुसार रिक्षा आणि पब्लीकट्रान्सपार्ट चे भाडे प्रादेशिक परिवहन प्रधिकरण आर टी ओ ठरवते. परंतू येथील मनमानी कारभारामूळे हा त्रास प्रवाशांना सोसावा लागतो. यावेळी रिक्षा युनिअन चे म्हणणे असे आहे की सीएनजी, स्पेअर पार्ट, मॅकेनिकल चॉर्ज , इन्शुरन्स व आर टी ओ च्या फी मध्ये वाढ झाल्यामुळे आम्हाला भाडेवाढ करणे जरुरी होते. आमच्या प्रतिनिधी प्रविण सुर्वे यांनी तपास केल्यावर असे निदर्शनास आले की ज्या स्थानावर १०रु. शेअर भाडे घेतले जात होते. तिथे ३ प्रवासी बसतात म्हणजे ३० रुपये होतात. नियमाप्रमाणे मीटर ने गेल्यास १८ रुपयांपेक्षा जास्त नाही होत. अगोदरच जास्त पैसे आकारुन शेअर रिक्षा चालवली जाते. व यामध्ये रिक्षावाल्यांची अरेरावी पहायला मिळते. मिरा भाईंदर मध्ये सर्व रिक्षा सीएनजी वर चालतात. मग इतकी भाडेवाढ का? असा एक प्रश्न प्रवाशांना पडला आहे. यामागे विविध राजकीय पार्टींचा सहभाग लाभला आहे यांची शक्यता नाकारता येत नाही.

# पदाचा गैरवापर करुन सब इंस्पेक्टरने केला महिला कॉन्स्टेबलवर बलात्कार




## ब्लॅकमेल करण्याचा अरोप, नवी मुंबईमध्ये गुन्हा दाखल

नवी मुंबई : जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र मेहनत करुन गुन्हेगारीला आळा बसवणाऱ्या पोलिस दलात नवीन खळबळ निर्माण झाली.आपल्यातील उच्च पदावर कार्यरत असलेले अधिकारी हाताखाली काम करणाऱ्यांवर हुकूमत गाजवतात अशी प्रकरणे वेळोवेळी पहायला मिळतात परंतू याहून पूढे रक्षकच भक्षक झाले अशी घटना नवी मुंबई पोलीस स्टेशनमध्ये घडली,मिळालेल्या माहीती नुसार नवी मुंबई पोलिस ठाणे च्या हद्दीत अपराध शाखेत कार्यरत सब इंस्पेक्टर अमित शेलार याने मार्च २०१७ मध्ये पिडीत महीला कॉन्स्टेबल यांना सॉप्ट ड्रिंक्स मध्ये गुंगीचे औषध टाकून बेशुध्द करण्यात आले व पिडीत महीलेवर लैगीकअत्याचर करण्यांत आले असे ३१ वर्षे पिडीत महीला कॉन्स्टेबल ने आरोप लावला आहे, याप्रसंगी आरोपी कडे व्हिडीओ फूटेज असल्याची व ती सर्वांना वायरल करेन अशी धमकी देत वारंवार त्या महीलेवर अनेक वेळा अश्या पध्दतीने कृत्य करत होता व मारपिट ही करत होता.असा आरोप सदर महीलेने लावला आहे. या संदर्भात आरोपी विरुध्द सिबीडी बेलापूर गुन्हा दाखल करण्यांत आला आहे परंतू आरोपी अजूनही मोकाट आहे.

# अजमल कसाब उत्तर प्रदेशातला रहिवासी..!

***नवी दिल्ली - मुंबई हल्ल्यातील आतंकवादी अजमल कसाब हा उत्तर प्रदेशातल्या औरैया जिल्ह्याचा रहिवासी असल्याचं जात-रहिवासी प्रमाणपत्र समोर आल्यामुळे उत्तर प्रदेश प्रशासनाला खडबडून जाग आली आहे. या प्रमाणपत्राने अधिकाऱ्यांची झोप उडवली असून, ते तयार करणाऱ्या संबंधित लिपीकास तात्काळ बडतर्फ करण्यात आलंय. तर, ते प्रमाणपत्र रद्द करण्यात आलं असून, ते तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करणाऱ्याच आता शोध घेतला जातोय.***



'इंडियन एक्सप्रेस' या वृत्तपत्राने प्रकाशित केलेल्या वृत्तानुसार, हे प्रकरण औरैया जिल्ह्यातील बिधून तहसील येथलं आहे. कसाबच्या नावानं तयार करण्यात आलेल्या या जात-रहिवासी प्रमाणपत्रावर त्याची जन्मतारीख २१ ऑक्टोबर २०१८ अशी नोंदविण्यात आली असून, त्याच जन्मस्थळ अंबेडकरनगर असं दर्शविण्यात आलंय. या प्रकरणामुळे उत्तर प्रदेश प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झालंय. तर थोडेफार पैसे देऊन उत्तर प्रदेशाती सरकारी कार्यालयांमध्ये कोणतंही प्रमाणपत्र केलं जाऊ शकतं यावर शिक्कामोर्तब झालंय. २६/११ रोजी मुंबईत झालेल्या आतंकी हल्ल्यात अजमल कसाबला जीवंत पकडण्यात आलं होतं.

### कोण हाता अजमल कसाब?

मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या आतंकवादी हल्ल्यात सहायक उप निरीक्षक तुकाराम यांनी आतंकवादी अजमल कसाबला जीवंत पकडणार तेव्हढ्यात कसाबनं तुकाराम यांच्वर गोल झाडली आणि पळ काढला. यात तुकाराम हे शहीद झाले होते. ज्या ठिकाणी कसाब पकडल्या गेला होता त्या ठिकाणी तुकाराम यांच्या स्मृती जपण्यासाठी त्यांचा पूतळा उभारण्यात आला आहे

# वाढत्या गुन्हेगारीवर जलदगतीने अंकुश बसवण्यासाठी मिरा-भाईंदरमध्ये ऑनलाईन क्राईम पोलीस रिसोर्स सेंटरचे उद्घाटन

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत लोकसंख्या मोठ्या झपाट्याने वाढत आहे. पण त्याचबरोबर गुन्हेगारी , महिलांवर होणारे अत्याचार , लहान मुलांना पळवून नेणे अशा अनेक गंभीर स्वरुपाच्या गुन्हयांमधेही वाढ होत आहे. अशाप्रकारच्या गुन्हेगारीला आळा बसावा , व आरोपी जलदगतीने पकडता यावा यासाठी पोलिस उपविभागीय अधिकारी कार्यालयामध्ये इंटरनॅशनल जस्टीस मिशन च्या सहाय्याने ठाणे ग्रामीण व भाईंदर पोलिस स्टेशनच्या वतीने सदर चे सेंटर चालवण्यात येणार आहे. या सेंटरचे उद्घाटन कोकणचे आयजी नवल बजाज ,यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ठाणे ग्रामीण चे पोलिस अधिक्षक डॉ. शिवाजी राठोड , मिरा भाईंदरचे सहाय्यक पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी व पोलिस व पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते. मिरा भाईंदर मध्ये अशाप्रकारचे रिसोर्स सेंटर सुरु करावे यासाठी मिरा भाईंदर सहाय्यक पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचा मोठा सहभाग आहे.



# जनतेवर करवाढीचा बोजा टाकून कार्यक्रमांसाठी लाखोंची उधळण

## जिद्दी मराठा संस्थेची तक्रार, संबंधितांवर कारवाईची मागणी

**मिरा रोड - जनतेच्या पैशांवर स्वत:ची राजकीय प्रसिध्दी करुन घेण्यासाठी शासनाने दिलेल्या खर्चाची मर्यादा ओलांडून मिरा-भाईंदर महापालिकेत लाखो रुपयांची उधळपट्टी सत्ताधारी आयुक्त तसेच पालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने नियमबाह्यपणे करत असल्याची तक्रार 'जिद्दी मराठा' संस्थेने शासनाकडे केली आहे. अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करुन केलेला खर्च लोकप्रतिनिधी तसेच अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यासह असे राजकीय उधळपट्टीचे कार्यक्रम बंद करण्याची मागणी केली आहे.**

मिरा-भाईंदर महापालिकेच्या वतीने विविध प्रकारच्या भूमिपूजन तसेच उद्घाटन सोहळ्यांसह पालिका आणि त्याअंतर्गत विविध समित्यांमार्फत कार्यक्रम केले जातात. या कार्यक्रमांसाठी भेटवस्तू, मंडप, रोषणाई, हारतुरे, निमंत्रणपत्रिका, अल्पोपाहार, बॅनरपासून विविध प्रकारचा खर्च करदात्या जनटच्या पैशांतून केला जातो. यासाठी पालिकेच्या तिजोरीतून लाखो रुपयांची उधळपट्टी केली जाते.



वास्तविक, २००८ साली शासनाने दिलेल्या आदेशानुसार 'ड' वर्गातील महापालिकांना समारंभासाठी येणाऱ्या खर्चाची मर्यादा पाच लाख रुपये इतकी करण्यात आली होती. तर, महापालिका अधिनियमातील कलम ६३ मध्ये कुठेही अशा कार्यक्रमांवर खर्च करण्याची तरतूद नाही.

कलम ६६ मध्येसुध्दा प्रदर्शन, खेळाचे सामने हे ऐच्छिक असल्याचे म्हटले आहे. आधीच पालिकेच्या डोक्यावर कर्ज आहे म्हणून ओरड करत लोकांवर भरमसाठ करवाढ लादायची आणि दुसरीकडे मात्र कार्यक्रमांच्या आड लाखो रुपयांची उधळपट्टी करायची, असा प्रकार पालिकेत सुरु असल्याचे जिद्दी मराठाचे प्रदीप जंगम यांनी म्हटले आहे.


याआधी भुयारी मार्गाच्या उद्घाटनासाठी आलेल्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाचा खर्च महापालिकेने केलाच नसल्याचे लेखी उत्तर देण्यात आले होते. पालिकेच्या कार्यक्रमाचा खर्चच जर पालिकेने केला नसेल, तर हा काळा पैसा कुठून आणला, ठेकेदाराकडून घेतला असल्यास तो कोणत्या नियमात घेतला, असे प्रश्न केले होते. पण पालिका प्रशासनाने मूग गिळून गप्प बसणेच पसंत केले.

दरम्यान, गेल्या वर्षी महापालिकेत महापौर, उपमहापौर यांची निवड झाल्यापासून आजपर्यंत झालेल्या खर्चाची आपण सखोल चौकशी करण्यासह बेजबाबदार अधिकाऱ्यांवर निलंबन कारवाई करावी.

अशा उधळपट्टीसाठी मागणी करणाऱ्या तसेच त्याचा उपयोग करणाऱ्या लोकप्रतिनिधींवर सुद्धा जबाबदारी निश्चित करावी.

कारवाई करुन जनतेचा उधळलेला पैसा वसुल करावा, अशी मागणी जंगम यांनी राज्याचे मुख्य सचिव, नगर विकास विभाग तसेच पालिका आयुक्त आणि सचिवांकडे केली आहे.

# मुंबईतील ४७ स्थानकांची सुरक्षा वाढवणार



**मुंबई-** मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील ४७ स्थानकांत एकात्मिक सुरक्षा यंत्रणेचा (इंटिग्रेटेड सिक्युरिटी यंत्रणा) दुसरा टप्पा राबविण्यात येणार असून त्यामुळे सुरक्षा व्यवस्था मजबूत होणार आहे. यामध्ये पश्चिम रेल्वेवरील ३०, तर मध्य रेल्वेवरील १७ स्थानकांचा समावेश असल्याची माहिती रेल्वे सुरक्षा दलाचे महासंचालक अरुण कुमार यांनी दिली.

२६ नोव्हेंबर रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याला दहा वर्षे होत असतानात रेल्वे स्थानकांतील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या हल्ल्यानंतर देशभरातील २०२ रेल्वे स्थानकांत एकात्मिक सुरक्षा यंत्रणेंतर्गत सुरक्षेचे विविध उपाय योजण्यात आले. यामध्ये मुंबईताल स्थानकांचाही समावेश होता. त्याच्या दुसऱ्या टप्प्याचा विस्तार करताना मुंबईतील ४७ स्थानकांची निवड करण्यात आली आहे. यामध्ये पश्चिम रेल्वेवरील मुंबई सेन्ट्रल, वांद्रे टर्मिनस, अंधेरी, बोरिवली, चर्चगेट, मरीन लाईन्स, चर्नी रोड, ग्रॅण्ट रोड, महालक्ष्मी, लोअर परळ, प्रभादेवी, दादर, माटुंगा रोड, माहिम, वांद्रे, खार रोड, सांताक्रूझ, विलेपार्ले, जोगेश्वरी, गोरेगाव, राम मंदिर, मालाड, कांदिवली, दहिसर, मीरा रोड, भाईंदर, नायगाव, वसई रोड, नालासोपारा, विरार या स्थानकांचा समावेश आहे. डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर, सीसीटीव्ही, बॅगेज स्कॅनर मशीन यासह अन्य काही सुरक्षा उपाययोजना राबविण्यात येतील.

# मराठा आरक्षणः मुख्यमंत्र्यांविरोधात हक्कभंग प्रस्ताव आणणार- विखे-पाटील

**मुंबई-** मागासवर्गीय आयोगाचा अहवाल सभागृहात सादर होण्यापूर्वीच 'आता आंदोलन करू नका, १ डिसेंबरला जल्लोष करा' असे वक्तव्य करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहाचा हक्कभंग केलेला आहे. त्यामुळे येत्या हिवाळी अधिवेशनात त्यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव आणणार असल्याची भूमिका विधानसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मांडली.

मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध मागण्यासांठी मुंबईत आझाद मैदानावर सकल मराठा क्रांती मोर्च्याच्या वतीने उपोषण सुरु आहे. उपोषणाचा शनिवार हा १६ वा दिवस होता. या आंदोलनकर्त्यांना भेटायला गेल्यानंतर विखे-पाटीलांनी माध्यमांसमोर बोलताना याबाबत सांगितले.



सरकारचा हा कोडगेपणा आहे. मागील १६ दिवसांपासून आंदोलनकर्ते उपोषणास बसले आहेत. अशावेळी कोणत्याही परिस्थितीत आंदोलकांना बोलावले जाते. सरकार जाणीवपूर्वक त्यांच्याकडे दुर्लक्ष करत आहे. मंत्री फिरकायला तयार नाहीत. ते समाजामध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप विखे-पाटीलांनी केला. मागील १६ दिवसांपासून हे आंदोलनकर्ते विविध मागणीसाठी उपोषणास बसले आहेत. पण सहकार मंत्री सुभाष देशमुख वगळता स्वत: मुख्यमंत्री किंवा त्यांच्या प्रतिनिधीने आंदोलनकर्त्यांची भेट घेतली नाही. देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांना कळवू असे म्हटले. पण त्यानंतरही काहीच झाले नसल्याचे ते म्हणाले.

# परळ टर्मिनस डिसेंबरमध्ये सुरू?

**मुंबई-** पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर परळ टर्मिनसचे काम डिसेंबर २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मध्य रेल्वे महाव्यवस्थापकांनी संबंधित विभागांना दिले आहेत. त्यामुळे कामाला गती मिळाली असून पुढील महिन्यात परळ टर्मिनसवरून लोकल सुटण्याची शक्यता निर्माण



झाली आहे. दादर स्थानकावरील भार कमी करण्यासाठी आणि परळमधील गर्दीच्या नियोजनासाठी हे टर्मिनस मार्च २०१९ पर्यंत सेवेत आणण्याचे उद्दिष्ट याआधी ठेवण्यात आले होते.

गेल्या काही वर्षांत दादर स्थानकावरील लोकल व प्रवाशांचा भार वाढला आहे. परळ स्थानकातही तीच परिस्थिती आहे. परळमधील सरकारी, खासगी कार्यालये, रुग्णालये तसेच लागूनच असलेले एल्फिन्स्टन रोड स्थानकामुळे परळ स्थानकावरही मोठा भार पडत आहे. हे पाहता परळ स्थानकाचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्प- २ (एमयूटीपी- २)मधील सीएसएमटी ते कुर्ल्यापर्यंतच्या पाचव्या-सहाव्या मार्गाचे काम सुरू असून याच प्रकल्पात परळ टर्मिनस प्रकल्प पूर्ण करण्याचे काम हाती घेण्यात आले. परळ टर्मिनस ९० कोटी रुपये खर्च करून २०१५ सालीच पूर्ण केले जाणार होते. प्रत्यक्षात दोन वर्षांपूर्वी कामाला सुरुवात करण्यात आली. प्रकल्पात पूर्वी अस्तित्वात असलेल्या फलाट क्रमांक एकच्या बाजूलाच एक टर्मिनसचा मार्ग बांधण्यात आला असून त्याच्या दोन्ही बाजूला फलाट आहे.

# आरोग्य विभागाचेच कुपोषण!

**मुंबई-** जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार सकल राज्य उत्पन्नाच्या किमान चार टक्के रक्कम आरोग्यावर खर्च होणे अपेक्षित आहे. मात्र, महाराष्ट्रात आरोग्यावर फक्त सव्वा टक्के रक्कम खर्च करण्यात येत असून तीही पूर्णपणे वापरण्यात येत नाही. तसेच आरोग्य विभागात डॉक्टरांसह १५,२९४ पदे रिक्त असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. राज्याच्या आरोग्य अर्थसंकल्पाचे आकारमान सुमारे नऊ हजार कोटी रुपये असून, प्रत्यक्षात वित्त विभागाकडून ही रक्कम कधीच दिली जात नाही. २०१८-१९ साठी आरोग्य विभागाने ४,१११ कोटी रुपयांची मागणी केली असताना वित्त विभागाने अवघे १,७४२ कोटी रुपये मंजूर केले. गेली चार वर्षे सातत्याने पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून आरोग्य विभागाला आपल्या खर्चासाठी वित्त विभागाकडे हात पसरावे लागतात. निधीअभावी औषध खरेदीत हात आखडता घ्यावा लागत असून, रुग्णालयांमध्ये औषधे उपलब्ध नसल्यामुळे आरोग्य विभागाच्या डॉक्टरांना रुग्णांच्या संतापाचा सामना करावा लागतो.



राज्याच्या आरोग्याचा कारभार सेंट जॉर्ज रुग्णालयातील ज्या 'आरोग्य भवन' येथून चालतो त्या संचालनालयाच्या अखत्यारीतील आरोग्य संचालक, अतिरिक्त संचालक, सहसंचालक, उपसंचालक, सहसंचालक, जिल्हा शल्यचिकित्सकांसह वैद्यकीय अधिकाऱ्यांची तब्बल २,६९० पदे गेल्या चार वर्षांत भरण्यातच आलेली नाहीत. शिवाय महाराष्ट्र वैद्यकीय अधिकारी गट 'अ', गट 'ब', बीएएमएस डॉक्टर तसेच गट 'क' व 'ड'ची जवळपास १५,२९४ पदे रिक्त असल्याचे आरोग्य विभागाच्या सूत्रांनी सांगितले. याशिवाय बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, नेत्रविशारद, अस्थिरोगतज्ज्ञ, मनोविकारतज्ज्ञ आदी ४८० पदे रिक्त आहेत.

# मराठा आरक्षण निर्णयावरून दोन्ही काँग्रेसचे नुकसान?

**मुंबई-** लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मराठा आरक्षणाचा मुद्दा सोडविण्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भर दिल्याने या मुद्द्यावरून राजकारण करणाऱ्या राष्ट्रवादी व काँग्रेसला फटका बसला आहे. आरक्षणाचा मुद्दा योग्यपणे मार्गी लागल्यास त्याचा फटका राष्ट्रवादीला बसू शकतो. दुसरीकडे शिवसेनेच्या राजकीय कार्यक्रम पत्रिकेवरच मराठा आरक्षणाचा मुद्दा नसल्याने सेनेचा ना नफा, ना तोटा होणार आहे.

आरक्षणाची अनेक वर्षे मागणी करणाऱ्या मराठा समाजाला जल्लोष करण्यासाठी १ डिसेंबरला सज्ज राहण्याची गोड बातमी मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे. येत्या रविवारी होणाऱ्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल स्वीकृत करून पुढील दिशा ठरविली जाईल. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय भाजप सरकार घेणार असले तरी कायदेशीर लढाई मोठी असल्याची सत्ताधारी भाजप नेत्यांना कल्पना आहे. निवडणुकीपूर्वी आरक्षणाच्या निर्णयाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यास त्याचे राजकीय परिणाम भोगावे लागतील याचीही भाजप नेत्यांना चिंता आहे.





२००४, २००९ आणि २०१४च्या विधानसभा निवडणुकांच्या वेळी राष्ट्रवादीने मराठा आरक्षणाचा मुद्दा मांडून मराठा मतदारांना आपलेसे करण्याचा प्रयत्न केला होता. कोपर्डी दुर्घटनेच्या निषेधार्थ राज्यात निघालेल्या मराठा समाजाच्या मोर्च्यांना राष्ट्रवादीची फूस असल्याची चर्चा झाली होती किंवा भाजप नेत्यांनी तसा जाहीरपणे आरोप केला होता. मराठा आरक्षणाचा मुद्दा मार्गी लागल्यास राष्ट्रवादीच्या शिडातील हवा जाऊ शकते. कारण या मुद्द्यावर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात राजकीय लाभ उठविण्याचा मुद्दाच राष्ट्रवादीच्या हातून जाणार आहे. काँग्रेसला मराठा समाजाची पारंपारिक मते मिळतात. पण राष्ट्रवादीशी आघाडी केल्याने मराठा समाजाच्या मतांचा होणारा लाभ काँग्रेसला मिळणार नाही.

# मुंबईतील सफाई कर्मचाऱ्यांचे 'काम बंद' आंदोलन

**मुंबई-** मुंबई महापालिकेने शहरातील कचरा गोळा करुन डम्पिंग ग्राऊंडपर्यंत पोहोचवण्याचे काम पूर्णपणे कंत्राटदाराकडे सोपवण्याचा निर्णय घेतला असून या निर्णयाविरोधात मुंबई महापालिकेतील कंत्राटी कामगार शुक्रवार पासून संपावर गेले आहेत. मुंबईतील २४ विभागांमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांनी शुक्रवारपासून कामबंद आंदोलन सुरु केले असून यामुळे मुंबईत कचरा कोंडी झाली आहे.

मुंबई महापालिकेने बुधवारपासून शहरातील साफसफाईचे काम कंत्राटदाराकडे सोपवण्याचा निर्णय घेतला. मात्र, यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून महापालिकेत काम करणाऱ्या शेकडो कंत्राटी कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. तर कायमस्वरुपी सफाई कामगारांना अन्य विभागांमध्ये सामावून घेतले जाणार आहे.

# आता खासगी शिवशाही चालकांना महामंडळाकडून प्रशिक्षण!

**मुंबई-** एसटीची आधुनिक ओळख म्हणून महामंडळात दाखल झालेली शिवशाहीअपघातांच्या सत्रात अडकली आहे. शिवशाहीचेअपघात रोखण्यासाठी एसटी महामंडळाने चालकांना विशेष प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. परिवहनमंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' असलेल्या शिवशाहीच्या अपघातांचा आलेख हा चढाच आहे. शिवशाहीवरील अपघात रोखण्यासाठी महामंडळाकडून उपाययोजनांवर भर देण्यात येत असून २४ विभागांतील सुमारे २ हजार ५०० चालकांसह तांत्रिक अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आले. पहिल्या टप्प्यात स्वमालकीच्या शिवशाहीच्या चालकांसह वाहतूक निरीक्षक (प्रशिक्षण), तांत्रिक पर्यवेक्षक यांना महामंडळाच्या पुणे येथील मध्यवर्ती



प्रशिक्षण संस्थेत शिवशाहीबाबत प्रशिक्षण दिले असून दुसऱ्या टप्प्यात खासगी शिवशाहीवरील चालकांना प्रशिक्षण मिळेल. नोव्हेंबर अखेर प्रशिक्षण प्रक्रिया सुरू होणार असल्याचे वाहतूक विभागाचे महाव्यवस्थापक आर.आर. पाटील यांनी सांगितले.

शिवशाहीच्या बैठ्या आणि शयनयान श्रेणीतील बसची लांबी, उंची यांच्यात साध्या एसटीच्या तुलनेत फरक आहे. त्याचबरोबर आधुनिक पद्धतीची बांधणी असल्यामुळे साध्या एसटीच्या तुलनेत शिवशाही चालवताना विशेषत: वळण घेताना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे स्वमालकीच्या एसटी चालकांनी सांगितले. एसटी महामंडळात एकूण २ हजार शिवशाही दाखल होतील. पहिल्या टप्प्यातील १२०० शिवशाहींपैकी सध्या ९७५ शिवशाही राज्यात धावत आहेत.

यापैकी ४८० शिवशाही या खासगी कंपन्यांच्या असून यात ६८ शयनयान आणि ४१२ बैठ्या आसनी शिवशाहीचा समावेश आहे. महामंडळाच्या मालकीच्या ४९५ शिवशाही प्रवाशांच्या सेवेसाठी धावत आहेत. सद्य:स्थितीत एकूण २६० पेक्षा अधिक शिवशाही या अपघातग्रस्त झाल्या आहेत. यापैकी सुमारे २०० अपघात हे गंभीर स्वरूपाचे असल्याचे अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

# मुंबईमध्ये डाळीसह कडधान्याचे भाव वाढू लागले

मुंबईमध्ये जवळपास दोन वर्षांपासून स्थिर असलेल्या डाळी व कडधान्याचे दर वाढू लागले आहेत. तूरडाळ होलसेल मार्केटमध्ये ५५ ते ८० रुपये व मूगडाळ ५६ ते ८० रुपये किलो दराने विकली जात आहे. यावर्षी उत्पादन कमी होण्याची शक्यता असल्यामुळे बाजारभाव अजून वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. मुंबईकरांसाठी दोन वर्षांपासून चांगले दिवस सुरू होते. गहू, तांदूळसह डाळी, कडधान्याचे दर नियंत्रणामध्ये होते. डाळींचे दर घसरू लागल्यामुळे शासनाने आयातीवर बंदी घातली होती. सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्र, गुजरात व इतर राज्यांमधून मुंबईत डाळी व कडधान्ये विक्रीसाठी येत आहेत. दोन वर्षांमध्ये प्रत्येक डाळीचे दर होलसेल मार्केटमध्ये ५० ते ६५ रुपये किलो होते. अपवाद दोन ते चार रुपयांचा फरक पडत होता. परंतु नोव्हेंबरच्या सुरुवातीलाच यामध्ये वाढ होण्यास सुरुवात झाली. सप्टेंबरमध्ये ५० ते ७५ रुपये किलो दराने विकल्या जाणाऱ्या तूरडाळीच्या दरामध्ये



वाढ होऊन ती ५५ ते ८० रुपये झाली आहे. मूगडाळ ६० ते ७५ रुपयांवरून ६५ ते ८० रुपये किलो झाली आहे. चणाडाळीचे दरही ५० ते ६५ रुपयांवरून ५८ ते ७० रुपये किलो एवढे झाले आहेत. होलसेल मार्केटमध्ये चांगल्या डाळीचे दर दोन वर्षांमध्ये प्रथमच ८० रुपयांवर गेले आहेत.

यावर्षी महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्येही पाऊस समाधानकारक झालेला नाही. यामुळे डाळींचे उत्पादन घटणार आहे. भविष्यात टंचाई निर्माण होण्याच्या शक्यतेने डाळींचे दर वाढू लागले आहेत. पुढील महिन्यात नवीन पिकाचे चित्र पूर्णपणे स्पष्ट होईल व त्यावर बाजारभाव वाढणार की स्थिर राहणार, हे स्पष्ट होणार आहे. सद्यस्थितीमध्ये फक्त तूरडाळीची आवक चांगली होती आहे. शुक्रवारी ३०० टन तूरडाळ विक्रीसाठी आली होती. चणाडाळ ७७ टन, मसूरडाळ २७ टन, उडीदडाळ ५१ टन, मूगडाळ ६६ टन आवक होत आहे. बाजारभाव वाढल्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळणार असल्यामुळे शेतकरीवर्ग आनंदात आहे. परंतु शासनाने बाजार समितीच्या बाहेरील अन्नधान्यावरील नियमन उठविले आहे. याचा गैरफायदा काही व्यापारी घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाजार समितीच्या बाहेर डाळी व कडधान्याचा साठा करून कृत्रिम टंचाई निर्माण करण्याची भीती बाजार समितीमधील काही कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. शासनाने डाळी व कडधान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी आतापासून उपाययोजना करणे आवश्यक आहे. वाढलेल्या बाजारभावाविषयी माहिती देताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सांगितले की, शासनाने बाजार समितीचे कार्यक्षेत्र मार्केटपुरते मर्यादित ठेवल्याचा परिणाम दिसू लागला आहे.

# म्हाडाच्या सोडतीतील घरांच्या किमतींचा पुनर्विचार करा

**मुंबई-** म्हाडाच्यामुंबई मंडळाच्या १,३८४ घरांसाठीची लॉटरी पुढच्या महिन्यात १६ डिसेंबरला फुटणार आहे. मात्र याही वर्षी म्हाडातील घरांच्या महागड्या किमतींमुळे मुंबईकरांना ऐन थंडीतही घाम फुटला आहे. म्हाडाच्या या महागड्या घरांवरून टीका सुरू असताना आता त्यात भर पडली ती म्हाडाच्या मुंबई विभागाचे अध्यक्ष मधू चव्हाण यांची. चव्हाण यांनी म्हाडाचे अध्यक्ष उदय सामंत यांना पत्र लिहून लॉटरीतील अत्यल्प, अल्प आणि मध्यम गटातील घरांच्या किमती ५ ते १० टक्क्यांनी कमी करण्याची मागणी करून म्हाडाला घरचा अहेर दिला.

म्हाडा अध्यक्षांना लिहिलेल्या पत्रात मधू चव्हाण यांनी उदय सामंत यांना म्हाडाच्या घरांच्या किमती या सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरच्या असल्याने किमतींबाबत अध्यक्षांनी तातडीने पुनर्विचार करावा अशी मागणी केली आहे. म्हाडाने या वर्षी घरांच्या किमती २५ ते ३० टक्क्यांनी कमी केल्या असल्या तरी या किमतींत घर घेणे हे अल्प, अत्यल्प गटातील लोकांना परवडणारे नाही. त्यामुळे घरांना जास्त प्रतिसाद मिळवायचा असेल तर मध्य, अल्प आणि अत्यल्प गटातील घरांच्या किमती ५ ते १० टक्क्यांनी कमी कराव्यात, असे चव्हाण यांचे म्हणणे आहे.

म्हाडाच्या किमती वर्षानुवर्षे वाढत चालल्या आहेत. या वर्षी तर म्हाडाच्या गँट रोड येथील घरांची किंमत ५ कोटींच्या घरात आहे. मागील लॉटरीत लोअर परळमधील घरे म्हाडाने १ कोटी ९५ लाख रुपयांना विक्रीसाठी





आणली. ही किंमत परवडणारी नसल्याने बहुतांशी घरे लॉटरी विजेत्यांनी म्हाडाला परत केली. हा इतिहास ताजा असूनही म्हाडाने या वर्षी महागडी घरे विक्रीसाठी आणली. त्यामुळे त्यांनी पुनर्विचार करून किमती कमी कराव्यात अशी मागणी चव्हाण यांनी केली. म्हाडाचे मुंबई अध्यक्ष असलेल्या चव्हाण यांनी किमती कमी करण्याचा जो घरचा अहेर दिला आहे त्यावर म्हाडा अध्यक्ष उदय सामंत काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सातव्या वेतन आयोगाचा अहवाल याच महिन्यात

**मुंबई-** सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा अभ्यास करणाऱ्या समितीचा अहवाल या आठवड्यात किंवा उशिरातउशिरा महिनाअखेपर्यंत राज्य सरकारला सादर केला जाणार आहे. त्यामुळे जानेवारी २०१९पासून राज्य कर्मचाऱ्यांना वेतनवाढ मिळेल, अशी माहिती वित्त विभागातील उच्चपदस्थ सूत्राने दिली. मराठा आरक्षणासंबंधीचा अहवाल सादर झाल्यानंतर सातव्या वेतन आयोगासंबंधीचा अहवालाकडे १७ लाख अधिकारी-कर्मचारी आणि साडे सहा लाख निवृत्त कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २०१६पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला. त्याच तारखेपासून राज्यातही आयोगाच्या शिफारशी लागू कराव्यात, यासाठी कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी आंदोलन केले. त्याची दखल घेऊन राज्य सरकारने आयोगाच्या शिफारशी कशा प्रकारे लागू कराव्यात, याचा अभ्यास करण्यासाठी गृह विभागाचे माजी अप्पर मुख्य सचिव के. पी. बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या समितीने लवकर अहवाल सादर करावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केली होती.

# खासगी बेस्ट गाड्या घेण्यास विरोध कायम

**मुंबई-** आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी खाजगी बसगाड्या भाड्याने घेण्याचा निर्णय बेस्ट उपक्रमाने घेतला आहे. यासाठी कामगार संघटनेला राजी करण्याचे प्रयत्न बराच काळापासून सुरू आहेत. या खासगीकरणाला बेस्टमधील कामगार संघटनांचा विरोध कायम असल्याने बेस्ट प्रशासनाची कोंडी झाली आहे. सतत वाढणारा इंधनाचा खर्च वाढत असून वाहतूक विभागाचा तोटा वर्षागणिक वाढत आहे. सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात बेस्ट प्रशासनाने ७२० कोटी तुटीचा अर्थसंकल्प सादर केला. त्यामुळे बचत करण्यासाठी खासगी बसगाड्या चालविण्याचा बेस्टचा प्रस्ताव आहे. मात्र या प्रस्तावाला सुरुवातीपासूनच कामगार संघटनांनी विरोध केला आहे. त्यामुळे बेस्टमधील मान्यताप्राप्त कामगार संघटनेचे नेते शशांक राव यांच्यासोबत नुकतीच एक बैठक घेतली. या



बैठकीत बेस्टचे महाव्यवस्थापक सुरेंद्र बागडे व बेस्ट समिती अध्यक्ष आशिष चेंबूरकर यांनी शशांक राव यांच्याकडे खासगी बसगाड्या वापरासाठी त्यांच्या कामगार संघटनेने परवानगी द्यावी व न्यायालयातील याचिका मागे घ्यावी असा आग्रह धरला. बस ताफ्यात नवीन एक हजार बसगाड्या घेण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले. मात्र शशांक राव यांनी बेस्टचे खासगीकरण होऊ देणार नाही, असे ठणकावले. त्यामुळे ही बैठक निष्फळ ठरली. पालिका प्रशासनाने केलेल्या शिफारशीनुसार बेस्ट उपक्रमाने कृती आराखडा तयार केला. त्यानुसार ४५० खाजगी बसगाड्या भाडेतत्त्वावर बेस्ट परिवहन विभागात चालविणे, प्रशासकीय खर्चात कपात करणे, उत्पन्न वाढीसाठी प्रयत्न करणे, कर्मचाऱ्यांचे भत्ते कमी करणे आदी आर्थिक सुधारणा कराव्या लागणार आहेत.

## संपादकीय...



संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

# आढावा बैठका सफळ व्हाव्यात

पावसाळा संपण्याआधीच राज्यात दुष्काळी परिस्थितीची चाहूल लागली. पावसाला खंडाने सुरुवात झाल्यामुळे पीक हंगामाचे काय होणार याची चिंता आधीपासूनच व्यक्त केली जात होती. अवेळी आलेल्या पावसाने पुन्हा पिकांना मोठा फटका दिला. आणि दुष्काळी वातावरणात राज्यात दुष्काळ जाहीर करावा आणि त्याचा लाभ संबंधितांना मिळावा यासाठी मागणी सुरू झाली. गेल्या काही वर्षात कायम दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. गेल्या वर्षाचा अपवाद होता. गेल्यावर्षी चांगला पाऊसकाळ झाला. पण पीक पेरणीचे नियोजन बिघडल्यामुळे विशिष्ट पिकांचे बंपर उत्पादन झाले. ते एवढे की, त्याचे नियोजन करणे सरकारला अवघड गेले आणि मोठ्या प्रमाणावर निघालेले पीक हीच एक समस्या झाली आणि शेवटी काय, तर चांगले पीक घेऊनही शेतकऱ्यांच्या हाती निराशाच आली. त्या वेळी कापूस पिकावर आलेली बोंड अळी असो किंवा मग मोठ्या प्रमाणावर झालेले तुरीचे उत्पादन यासंदर्भात झालेले नुकसान त्याची प्रकरणे अद्याप मिटलेली नाहीत. विरोधक आरोप करतात, सरकार आम्ही संबंधितांना चांगल्या प्रकारे न्याय दिल्याचे सांगतात. अनेकांना काही मदत मिळाली, अनेक जण मदतीस पात्र ठरले नाहीत, अशा अनेक बाबी समोर आल्या. कर्जमाफीच्या बाबतीतही काही ठिकाणी परिस्थिती फारशी वेगळी नाही.



त्यातच आधी परतीचा पाऊस रुसल्याने आणि नंतर पाऊस गायब झाल्यामुळे सध्या उभे असलेले पीक धोक्यात आहे. त्यापेक्षा गंभीर बाब म्हणजे पुढची पेरणीही वांध्यात आली आहे. पेरणीच न झाल्यामुळे मग पीक विमा कसा भरणार, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. विरोधकांनी राज्यात सरसकट दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीवरून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला, पण सरकारने पाऊस, तेथे उपलब्ध असलेला पाणी साठा आणि झालेले पीक या सगळ्याचा अभ्यास करून मध्य आणि अति दुष्काळी अशा स्वरूपाची काही गावे जाहीर केली आहेत. त्या भागाला दुष्काळी भागाचे सगळे लाभ मिळणार आहेत. दरम्यान, राज्यावरील दुष्काळ निवारणासाठी मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाकांक्षी अशी जलयुक्त शिवारसारखी योजना राबवली. काही ठिकाणी या योजनेमुळे पाणी दिसत आहे, मात्र या कामांबाबत विरोधकांनी आक्षेप घेत त्याबाबत मोठे आक्षेप नोंदवले आहेत. विरोधकांचे आक्षेप जोरकसपणे खोडून काढणारे खुलासे सरकारकडून होत नसल्यामुळे विरोधकांचे आरोप सुरूच आहेत.

या सगळ्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री स्वतः प्रत्येक जिल्ह्यात जाऊन आढावा बैठका घेत आहेत. त्यांनी हे चांगले पाऊल उचलले आहे. त्यानिमित्ताने सत्ताधारी, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला नेमक्या स्थितीचा अंदाज येत आहे. शिवाय प्रत्येक जिल्ह्यातील प्रश्न, तेथे सुरू असलेली विकासकामे, रखडलेले प्रश्न यावर सविस्तर चर्चा होत आहेत. राज्यात गेल्या काही महिन्यांत वेगवेगळ्या विषयांवर वेगवेगळ्या समाजघटकांचे मोठे आंदोलन सुरू आहेत. त्यात मग मंत्र्यांचा ताफा अडवणे, त्यांना काळे झेंडे दाखवणे, त्यांच्या सभांत हुल्लडबाजी करण्याची काही प्रकरणे समोर आली. त्यामुळे सत्ताधारी लोकांत मिसळत नाहीत, अशी धारणा विरोधकांकडून केली जात होती. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. अनेक वर्षे मुख्यमंत्री किंवा मोठे मंत्री खासगी किंवा कार्यकर्त्यांच्या कार्यक्रमासाठी दौरा आखायचे आणि त्याला आढावा बैठकीचे गोंडस नाव द्यायचे, विद्यमान मुख्यमंत्री मात्र खऱ्या अर्थाने आढावा घेत प्रश्न तेथेच सुटावे यासाठी कडक धोरण राबवत आहेत हे अलीकडच्या दौऱ्यांतून दिसून येत आहे. कडक बंदोबस्तामुळे निवेदन घेऊन भेटण्यासाठी इच्छुकांना ते भेटत नसल्याची नाराजी पाहायला मिळत आहे. बैठकांसाठी तगडी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आल्यामुळे या बैठकांकडे पाहण्याचा सर्वसामान्यांचा दृष्टिकोन वेगळा झाला आहे, पण साध्या साध्या आणि सरकारच्या हातात नसलेल्या विषयांवर काहींनी केलेल्या अवास्तव आंदोलनाचा तो परिपाक आहे, हे विसरता येणार नाही. आढावा बैठकीच्या दौऱ्यात सामान्यांना वेळ द्यावा का, याबाबतचा प्रोटोकॉल वेगळा असू शकतो, पण राज्याच्या मुखियाने आमचे प्रश्न समजून घ्यावेत, आमचे निवेदन स्वीकारावे, अशी भाबडी आशा प्रश्न, समस्या न मिटलेल्या वर्गाला असते, ती मात्र पूर्ण होत नसल्याने आणि त्यांच्याभोवती पक्ष पदाधिकाऱ्यांचा मोठा गराडा असल्यामुळे थोडा नाराजीचा सूर पाहायला मिळत आहे. मुख्यमंत्र्यांच्या आढावा बैठकांवर विरोधक आपापल्या पद्धतीने टीका करत, आम्हीच तुमचे खरे तारणहार आहोतहे दाखवण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेत आणि सरकार मात्र प्रशासनाला सोबत घेऊन प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेत असल्याचे या बैठकांतून दिसते. त्यांचे दौरे सफल व्हावेत आणि विकासाचा वेग वाढावा एवढेच.

# घर आणि घरघर



**राज्यातील अनेक शहरे बकाल बनली असताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ताब्यातील भूखंडांवर पुन्हा घरे बांधण्याचा घाट घालणे हे नव्या संकटांना आमंत्रण देणारे आहे. मोकळ्या भूखंडावर घरे बांधल्याने बेघरांचा प्रश्न कायमचा सुटण्याची शक्यताच नाही. कारण शहरांकडे येणारे लोंढे त्यामुळे वाढणारच. मग अशा योजना आखत बसणे हेच काम यापुढील सरकारांनाही करावे लागेल. राज्यात झोपु योजना किती प्रमाणात यशस्वी झाल्या, याचा जरी शोध घेतला, तरीही अशा नव्या योजनांचे फोलपण लक्षात येईल.**

सर्वासाठी घर ही योजना कागदावर कितीही देखणी असली, तरी तिच्या अंमलबजावणीसाठी लागणारी जमीन कुठून आणायची या प्रश्नाचे उत्तर त्या योजनेच्या निर्मात्यांकडे नाही. ही योजना कागदावरच राहू नये, म्हणून आता या योजनेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जमिनीही उपलब्ध करून देण्याचा निर्णय राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. बेघरांना घरे देण्याचे आश्वासन निवडणूक जाहीरनाम्यापुरतेच असते, हे यापूर्वीच्या सत्ताधाऱ्यांनाही कळून चुकले होते. मात्र काहीही करून अशी घरे द्यायचीच, असा चंग बांधून राज्य सरकारने शहरांतील जमिनींकडे नजर वळवली असावी. हे सर्वथा चुकीचे आणि दूरगामी परिणाम करणारे आहे. देशात नागरीकरणाचे सर्वाधिक प्रमाण महाराष्ट्रात आहे. त्यामुळे या राज्यातील सगळ्या शहरांकडे ग्रामीण भागातून येणाऱ्यांचे लोंढे दिवसेंदिवस वाढतच आहेत. खेड्यांमध्ये रोजगार उपलब्ध नाहीत आणि शहरात ते आहेत, या कल्पनेने येणारे हे लोंढे थांबवण्यासाठीची उपाययोजना करण्याऐवजी या लोंढ्यांमधून येणाऱ्या हजारोंना मालकीचे घर देण्याचे स्वप्न दाखवणे हे तर कोणत्याही सत्ताधाऱ्यांसाठी अधिकच फायद्याचे. परंतु त्यामुळे आधीच बकालतेच्या टोकाला पोहोचलेली शहरे निवासायोग्य तरी राहतील का, या प्रश्नास भिडणार कोण? स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जमिनींबरोबरच गायरान जमिनीही घरांसाठी उपलब्ध करून देण्याच्या या निर्णयाची खरोखरीच अंमलबजावणी झाली, तर शहरांमध्ये श्वास घेणेही कठीण होऊन बसेल. अधिक घरे निर्माण करायची, तर त्यासाठी आवश्यक असलेल्या पाणी, ड्रेनेज, रस्ते, कचरा, स्थानिक वाहतूक व्यवस्था यांसारख्या सोयीसुविधांची यंत्रणा उभी करणे आवश्यक असते. परंतु त्याकडे कानाडोळा करीत केवळ घरे बांधून टाकायची आणि नंतर तेथे राहणाऱ्या नागरिकांना वाऱ्यावर सोडून द्यायचे, या प्रकारच्या धोरणांमुळेच राज्यातील सगळी शहरे आत्ताच कडेलोटाच्या टोकावर येऊन ठेपली आहेत.

मुंबईसारख्या महाकाय शहरात ज्या थोड्याफार जमिनी शिल्लक असतील, त्यावरही बेघरांचे पुनर्वसन करण्याची मागणी शिवसेनेने करणे, हे म्हणूनच त्या पक्षाच्या अदूरदर्शीपणाचे लक्षण ठरते. मोठ्या शहरांमधील जमिनींचा वापर किती योग्य प्रमाणात होतो, यावर अनेकदा चर्चा घडल्या. केवळ चार भिंतींचे घर एवढीच माणसाची गरज नसते. राहणे सुसह्य होण्यासाठी अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध होणे आवश्यक असते. घर आहे, पण तेथपर्यंत पोहोचण्यासाठी रस्ताच नाही. पाणीपुरवठा अपुरा आहे आणि मलापाण्याच्या निचऱ्याची सोयच नाही, घरातला कचरा रस्त्यावर पडून तेथेच कुजवत ठेवून रोगराईला निमंत्रण मिळते आहे, ही अवस्था जगण्याचा स्तर किती खालावत चालला आहे, याची निदर्शक आहे. या सोयी देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना जागा नसते आणि त्यासाठी पैसे मोजावे लागतात. जमीन मिळाली तर कज्जेदलाली होते. त्यामुळे विविध कारणांसाठी आवश्यक असणाऱ्या जमिनी मिळवण्यातच स्थानिक स्वराज्य संस्थांपुढे प्रचंड अडचणी आहेत. त्यातच त्यांचे उत्पन्न दिवसेंदिवस घटत असल्याने नव्याने भूखंड मिळवणेही जिकिरीचे बनत चालले आहे. अशा स्थितीत त्यांच्याकडे असलेल्या जमिनी घरांसाठी ताब्यात घेणे अधिकच धोकादायक ठरणारे आहे. मुंबईसारख्या शहरात अशा भयाण अवस्थेत जगणाऱ्यांना कोणी वाली नाही. मुंबईबरोबरच पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, अमरावती यांसारख्या शहरांमधील परिस्थिती सुधारण्याची शक्यता नाही. मदाने, सांस्कृतिक केंद्रे, वाहनतळ, कारखाने, व्यवसाय अशा अनेक कारणांसाठी जमिनींचा योग्य प्रमाणात वापर होणे हे आदर्श नियोजनासाठी गरजेचे असते. भारतीय नियोजनाची खासियत अशी, की या सगळ्या मुद्द्यांचा खूप उशिराने विचार सुरू होतो. त्यामुळे आहे ते आहे तसे ठेवून त्यात सुधारणा करण्याचा अतिशय तोकडा प्रयत्न सुरू होतो. प्रत्यक्षात त्यातील काहीच साध्य होत नाही आणि परिणामी केवळ अर्थार्जनाच्या गरजेपोटी आलेल्या नागरिकांच्या भाळी भयावह जगण्याचा शाप मात्र येतो. 'शहरातील मोकळ्या जमिनी या फुफ्फुसांचे काम करतात', यासारखे विचार कधीही आचरणात न आणावयाच्या 'सुविचारा'त रूपांतरित होतात. मोकळ्या जागा या राजकारण्यांच्या मालकीच्या असतात आणि तेथे केवळ त्यांचाच अधिकार चालतो, हे वास्तव गेल्या अनेक दशकांत सगळे जण अनुभवत आहेत. त्यामुळे सार्वजनिक वाहतूक तळ उभारण्यासाठी राखून ठेवलेल्या जागेवर रातोरात झोपड्या तयार होतात आणि कालांतराने, तेथे सगळ्या सोयीसुविधा पुरवण्यासाठी स्पर्धा सुरू होते. राज्यातील शहरांमधील अशा किती तरी भूखंडांवर अनेकांनी आजवर आपले अधिकार गाजवले आणि त्याचा राजकीय फायदाही करून घेतला. या वस्तुस्थितीची संपूर्ण जाणीव असतानाही, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ताब्यातील मोकळ्या भूखंडांवर पुन्हा एकदा घरे बांधण्याचा घाट घालणे हे नव्या संकटांना आमंत्रण देणारे आहे.

कमाल जमीन धारणा कायद्याची निर्मितीही याच कारणांसाठी झाली आणि त्यामुळे शहरांमध्ये असलेल्या भूखंडांचे प्रचंड प्रमाणात घरे बांधण्यात आली. आणीबाणीच्या काळात म्हणजे, १९७६ मध्ये आलेल्या या कायद्यानुसार प्रत्येक कुटुंबाला एक हजार चौरस मीटरपर्यंतच मोकळी जागा ताब्यात ठेवण्याचा अधिकार देण्यात आला. त्यामुळे अतिरिक्त झालेली जमीन सरकारकडे जमा करून घेण्यासाठी सरकारी यंत्रणा तेव्हा वेगाने कामाला लागली. हे अतिरिक्त क्षेत्र ताब्यात ठेवण्यासाठी तेथे बांधण्यात येणाऱ्या एकूण घरांपैकी दहा टक्के घरे सरकारला द्यावी लागत. ही सरकारच्या मालकीची घरे निकड असलेल्यांना वाटण्यात येत. या कायद्याच्या आधारे महाराष्ट्रातील बहुतेक सर्वच शहरांत घरांच्या बांधकामांना वेग आला, कारण ही अतिरिक्त जमीन बिल्डरांकडे सोपवण्यात येऊ लागली. त्यातील पारदर्शकतेला हळूहळू तिलांजली मिळत गेली आणि केवळ बिल्डरांचीच धन मात्र झाली. हा कायदा २००८ मध्ये रद्द करण्यात आला, तरीही त्यामुळे निर्माण झालेले प्रश्न मात्र अजूनही सुटलेले नाहीत. त्या काळात अशा अतिरिक्त जमिनींवर बांधलेल्या घरांच्या पुनर्वसनाचा प्रश्न तातडीने सोडवला गेला, तर त्याच भूखंडांवर अधिक घरांची निर्मिती शक्य आहे. परंतु त्याकडे कानाडोळा करीत पुन्हा नव्याने मोकळ्या जागांचा शोध घेऊन त्या बिल्डरांना देण्याने नेमके काय साध्य होणार आहे?

# नवी मुंबईत शेकडो इमारतींचे भवितव्य धोक्यात

**ठाणे : सिडको आणि पनवेल महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम चालू असलेल्या प्रकल्पांत ज्या विकासकांनी विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधकाम केले असेल, त्यांना भोगवटा प्रमाणपत्र द्यावे, असे नवे आदेश राज्याच्या नगरविकास विभागाने पनवेल महापालिकेला गुरुवारी दिले. या आदेशामुळे पनवेल आणि सिडको क्षेत्रातील शेकडो इमारतींचे भवितव्य टांगणीला लागले आहे. यापूर्वी नियमबाह्य बांधकाम परवानग्या देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना शासनाने दिले होते.**

अनेक बिल्डरांनी विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लंघन करून, इमारती



बांधलेल्या असतानाही सिडकोने २०१६ पासून त्यांना बांधकाम परवानग्या दिल्या आहेत. प्राप्त तक्रारीनुसार सिडकोने बांधकाम परवानग्या या बेकायदेशीर व नियमबाह्य असल्याचा अहवाल पुण्याच्या नगररचना संचालकांनी नगरविकास विभागाचे प्रधान सचिव नितीन करीर यांच्याकडे सादर केला आहे. त्यानंतरही सिडकोने दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घातले होते. त्यामुळे शासनाने कठोर भूमिका घेत परवानग्या देणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याचे स्पष्ट आदेश ३ ऑगस्ट, २०१७ रोजी सिडको व्यवस्थापकीय संचालकांना दिले होते, परंतु सिडकोने त्याची अंमलबजावणी न करता, जुन्या बांधकाम परवानग्यांना भोगवटा प्रमाणपत्र देणे सुरूच ठेवले.

२०१६ साली पनवेल महापालिका अस्तित्वात आल्यानंतर खारघर, करंजाडे, तळोजा, कामोठे, कळंबोली हा भाग पनवेल पालिकेत हस्तांतरित झाला. पनवेल पालिकेने सिडकोचीच 'री' ओढली. त्या वेळी प्राप्त तक्रारींची दखल घेऊन, पनवेल पालिकेचे तत्कालीन आयुक्त सुधाकर शिंदे यांनी १३ एप्रिल, २०१८ रोजी नगरविकास विभागाला पत्र देत सरकारच्या ३ ऑगस्ट, २०१७च्या आदेशाबाबत शासनाचा अभिप्राय मागवला. तेव्हापासून पनवेल पालिका क्षेत्रातील सिडको हस्तांतरित बांधकामांना भोगवटा प्रमाणपत्र देणे बंद केले. या पत्राचा विद्यमान आयुक्त गणेश देशमुखांनी पाठपुरावा केला. त्यानुसार, १५ नोव्हेंबर, २०१८ रोजी नगरविकास विभागाने पनवेल पालिकेला हे आदेश दिले. चटईक्षेत्राची चोरी ही सिडको क्षेत्रातल्या उलवे, द्रोणागिरी येथेही झाली आहे. त्यामुळे सिडकोच्या भूमिकेकडे तज्ज्ञांचे लक्ष लागले आहे.

मुंबई महानगर प्रदेशात शासनाची वेगवेगळी प्राधिकरणे आहेत. प्रत्येकाची बांधकाम नियंत्रण नियमावली वेगळी आहे. त्यामुळे विकासकांचा गोंधळ उडतो. यामुळे एमएमआरडीए क्षेत्रासाठी शासनाने जी समान बांधकाम विकास नियंत्रण नियमावली तयार केली आहे, तिची लवकर अंमलबजावणी करून काटेकोरपणे पालन केले, तर असे प्रकार होणार नाहीत.

# भाईंदरकरांना भरमसाट पाणी देयके

**मीरा-भाईंदर महानगरपालिकेकडून नागरिकांना सध्या भल्यामोठ्या रकमांची पाणी देयके पाठवण्यात येत आहेत. देयकांमध्ये अचानक झालेल्या या वाढीमुळे नागरिकांचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली आहे.**

महापालिकेकडून दर चार महिन्यांनी पाण्याची देयके पाठवण्यात येत असतात. नळजोडणीला बसविण्यात आलेल्या मीटरची नोंद घेऊन त्याप्रमाणे देयके तयार केली जातात आणि जी मीटर बंद अवस्थेत आहेत, त्यासाठी प्रशासनाकडून सरासरी देयके पाठवली जात असतात. मात्र मीटर चालू अवस्थेत असतानाही सध्या मूळ रकमेच्या कित्येक पटीने जास्त रकमेची देयके पाठवण्यात येऊ लागली आहेत. देयकांची भरमसाट रक्कम येत असल्याच्या महापालिकेकडे लेखी तक्रारी करूनही त्याची दखलच घेतली जात नसल्याचे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. देयक भरले नाही तर नळजोडणी खंडित करण्याची भीती असल्याने नागरिक नाइलाजास्तव देयके भरत आहेत.

भाईंदर पश्चिम येथील इंदिरा बाजारात सुमारे दीडशे फुटांचे दुकान असलेल्या सालियन यांना महापालिकेकडून अर्धा इंच व्यासाची नळजोडणी देण्यात आली आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून त्यांना चार महिन्यांसाठी आठशे रुपयांच्या आसपास देयक येत असे. त्याचा नियमित भरणा करण्यात आलेला आहे, परंतु यंदा मात्र कहरच झाला. जानेवारी ते एप्रिल या चार महिन्यांसाठी सालियन यांना तब्बल ६ हजार ३०० रुपयांचे देयक पाठवण्यात आले. एवढ्या भरमसाट रकमेचे देयक आल्यानंतर सालियन यांनी पाणीपुरवठा विभागाकडे चौकशी केली. त्या वेळी हे देयक भरा. पुढच्या वेळी नेहमीप्रमाणे देयक येईल, असे त्यांना सांगण्यात आले. त्यामुळे हे देयक सालियन यांनी निमूटपणे भरले. मात्र त्यानंतर आलेले देयक पाहून त्यांचे डोळेच पांढरे व्हायची वेळ आली. कोणतीही थकबाकी



नसताना सालियन यांना ९ हजार ७७० रुपयांचे देयक पाठवण्यात आले आहे.

पाण्याच्या देयकात वाढ होत असल्याने गेल्या काही महिन्यांपासून सालियन यांनी आपल्या मीटरची नियमितपणे नोंद ठेवली आहे. मात्र महापालिकेने पाठवलेल्या देयकात त्यांच्या मीटरवरील नोंद आणि सालियन यांनी ठेवलेल्या नोंदीत प्रचंड तफावत असल्याचे दिसून येत आहे. मुळात मीटरचे रीडिंग घेण्यासाठी कर्मचारी गेल्या कित्येक महिन्यांत जागेवर फिरकलेलेच नाहीत, असा आरोप सालियन यांनी केला आहे. या प्रकरणी सालियन यांनी पाणीपुरवठा विभागाकडे लेखी तक्रार नोंदवली आहे. मात्र त्याची दखल घेण्यात आलेली नाही असे सालियन यांचे म्हणणे आहे. इंदिरा बाजारातील अन्य दुकानदारांनाही अशाच पद्धतीने भरमसाट पाणी देयक आल्याने तेही त्रस्त आहेत.

# कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे शहरातील महिलांचे स्तनाच्या कर्करोगाकडे दुर्लक्ष

## भारतात दरवर्षी १ लाख तीस हजार नवीन स्तनाच्या कर्करोगाच्या केसेसची नोंद

**मुंबई /ठाणे :** आज सकाळी बॉलिवूडमधील एका प्रख्यात अभिनेत्रीने आपल्याला कर्करोगाची लागण झाली असून हा कर्करोग तिसऱ्या टप्प्यात असल्याची धक्कादायक माहिती दिली. इरफान खान, सोनाली बेंद्रे यांच्यावर सुरु असलेल्या कर्करोगाच्या बातम्या आपण वाचतच असतो तरीही आपल्याकडे कर्करोगाविषयी अजूनही जागरूकता झाली नसल्याचे दिसत आहे. ऑक्टोबर महिन्यात ब्रेस्ट कॅन्सर अवेअरनेस महिना साजरा केला जातो व या निमित्ताने मुंबई शहरामध्ये स्तनाच्या कर्करोगविषयी जागरूकता आणण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात असले तरीही शहरातील महिलांमध्ये याविषयी अजूनही जागरूकता आलेली नसल्याचे निरीक्षण बोरिवली येथील अपेक्स ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या समूहाने नोंदविले आहे. अपेक्स ग्रुप ऑफ हॉस्पिटलची पश्चिम उपनगरात ४ अत्याधुनिक हॉस्पिटल तसेच मुलुंड येथे एक हॉस्पिटल असून अपेक्स समूहाने ऑक्टोबर महिन्यात महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाविषयी



जागरूकता आणण्यासाठी ५०० महिलांना याविषयी विचारले असता यातील फक्त २०० महिलांना स्तनाच्या कर्करोगाविषयी माहित असल्याचे समजले. ३५ ते ५० वयोगटातील महिला यामध्ये सहभागी झाल्या होत्या. मधुमेह उच्च रक्तदाब तसेच हृदयविकार याविषयी जाणकारी असलेल्या या महिलांमध्ये स्तनाचा कर्करोग का होतो? कोणत्या वयात होतो तसेच यावर उपचार काय केले जातात याबाबतचे सखोल ज्ञान नसल्याचे दिसून आले. स्तनाचा कर्करोग म्हणजे लवकर मृत्यू अशी माहिती काही महिलांनी दिली.

याविषयी अधिक माहिती देताना अपेक्स ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या लेप्रोस्कोपिक शल्यचिकीत्सक डॉ. अदिती अग्रवाल म्हणाल्या' सध्या स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असून गेल्या दहा वर्षात यात झपाट्याने वाढ झाली आहे. ग्लोबोकॅनच्या सर्वेनुसार १ लाख महिलांमध्ये २५ महिलांना स्तनाचा कर्करोग होतो तर २२ महिलांना गर्भाशयाचा कर्करोग होतो व यातील ५० टक्के महिलांना योग्य उपचाराअभावी अथवा कर्करोग तिसऱ्या टप्प्यात माहित झाल्यामुळे होतो. बदलती जीवनशैली, असंतुलित आहार, प्रदूषण आणि कामाचा अतिरिक्त ताण यांमुळे मुंबईसह मोठ्या शहरांतील महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे. धक्कादायक म्हणजे पन्नाशीनंतर होणा-या या कर्करोगाचे प्रमाण शहरामध्ये १८ ते ३० वयोगटांतील तरुणींमध्येसुद्धा असल्याचे आढळून आले आहे. महिला आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात व यामुळे त्यांच्या आजाराचे निदान उशिरा होते. प्रत्येक महिन्यात स्व-स्तन परीक्षण, दरवर्षी तज्ञ डॉक्टरांकडून स्तनांची तपासणी व चाळिशीनंतर दरवर्षी मॅमोग्राफी करणे आवश्यक आहे. या नियमित तपासण्यांमुळे स्तनांच्या कर्करोगाचे लवकर निदान शक्य आहे आणि त्यातून रुग्ण पूर्णपणे बरे होऊ शकतो हा आत्मविश्वास आम्ही यावेळी या महिलांना दिला.'

देशात दरवर्षी सुमारे १.३ लाख ताज्या ब्रेस्ट कॅन्सरची प्रकरणे नोंदवली जातात. दहा वर्षांपूर्वी ती ५४,००० च्या घरात होती. शहरांमध्ये या प्रकारचा कर्करोग अगदी सामान्य झाला आहे तर ग्रामीण भागात दुस-या क्रमांकावर आहे. वास्तविक भारतीय महिलांमध्ये आढळणा-या सर्व प्रकारच्या कर्करोगात एक-चतुर्थांश प्रकरणे स्तनाच्या कर्करोगाशी संबंधित असतात. तसेच कर्करोगाने मृत्यू होणा-या प्रकारात स्तनाच्या कर्करोगाचे कारण पाचव्या स्थानावर आहे.

**अधिक माहितीसाठी : उमेश भोगले - ९८२०३३२५१५**

## थोडक्यात

### रेल्वे सुरक्षा दल मोबाईल ॲप विकसित कणार

**नवी दिल्ली-** रेल्वे सुरक्षा दलाने (आरपीएफ) मोबाईल ॲप विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. या अभिनव मोबाईल ॲपमुळे पोलिसांकडून प्रवाशांना हद्दीच्या वादापायी गुन्हा दाखल करण्यात होणारी टाळाटाळ करणे अशक्य होणार असून प्रत्येक गुह्याची



वेगाने नोंद होऊन चोरांच्या मुसक्या आवळणे सोपे होणार आहे. चालत्या गाडीत चोरी झाल्याचे लक्षात येईपर्यंत गाडीने बरेच अंतर कापलेले असते. त्यामुळे गुन्हा नोंदविताना हद्दीचा मुद्दा समोर येतो. त्यामुळे नेमके ठिकाण समजेपर्यंत तक्रार नोंदविण्यातच वेळ वाया जातो. त्यामुळे प्रवाशांनी तत्काळ मोबाईल ॲपवरच गुह्याची तक्रार द्यायची अशा प्रकारचे नवीन ॲप विकसित केले जाणार आहे. अशा ॲपचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाला पाठविला असल्याची माहिती आरपीएफचे महासंचालक अरुण कुमार यांनी दिली.

### बेस्टचा ७६९ कोटी तुटीचा अर्थसंकल्प मंजूर

**मुंबई -** बेस्ट उपक्रमाचा सन २०१९-२०चा ७६९ कोटी ६८ लाख रुपये तुटीचा अर्थसंकल्प शुक्रवारी रात्री उशिरा बेस्ट समितीमध्ये मंजूर झाला. बेस्टचा अर्थसंकल्प ७२० कोटी ५४ लाख रुपये तुटीचा होता. आता त्यात आणखीन ४९ कोटी १४ लाखांची वाढ झाली.

या अर्थसंकल्पात बेस्टच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस देण्याची आणि त्यासाठी एक कोटीची तरतूद केली आहे. राज्य सरकारला पोषण अधिभारापोटी देय असलेली ५५० कोटींची थकबाकी चुकती करण्यासाठी ४० कोटींची तरतूद केली आहे. बेस्टच्या कर्मचाऱ्यांना जाहीर केलेल्या बोनसची पाच हजार ५०० रुपये रक्कम दिवाळी संपल्यानंतरही न दिल्याने काँग्रेस, राष्ट्रवादीच्या सदस्यांनी अर्थसंकल्पाच्या चर्चेवर प्रारंभीच बहिष्कार टाकला होता.

### शाळांना अनुदान द्या अन्यथा आत्मदहन करू आंदोलनकर्त्या शिक्षकांचा सरकारला इशारा

**मुंबई :** आझाद मैदानावर आंदोलन करणाऱ्या स्वाभिमान शिक्षक संघटनेचे राहुल खैरनार यांनी सरकारला आत्मदहनाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्रातील अनेक शाळा अनुदानापासून वंचित आहेत. याबाबत आझाद मैदानात गेल्या ५३ दिवसांपासून आंदोलन सुरू आहे. परंतू, सरकार याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे आज त्यांच्याकडून आत्मदहनाचा इशारा देण्यात आला. राज्य



शासनाने १५ नोव्हेंबर २०११ च्या निणऱ्यानुसार राज्यातील शाळांचे मूल्यांकन करून अनुदान देण्याचे मान्य केले. त्यामध्ये ३८९ प्राथमिक व ५९ माध्यमिक शाळा अनुदान पात्र ठरल्या आहेत. ३० ऑगस्ट २०१६ रोजीच्या मंत्री मंडळाच्या बैठकीत अनुदानास पात्र १६२८ शाळा व २४५२ वर्ग तुकड्यांना ८० ते १०० टक्के अनुदान देण्याचे मान्य करण्यात आले. मात्र २० टक्केच अनुदान देण्यात आले. यामुळे या शाळांमधील शिक्षकांचे हाल होत आहेत. काही शिक्षक निवृत्त झाले आहेत तर काही शिक्षक निवृत्त होणार आहेत. या शिक्षकांना न्याय मिळावा म्हणून शाळांना १०० टक्के अनुदान देण्यात यावे म्हणून आझाद मैदानात गेले ५३ दिवस आंदोलन सुरू आहे. मात्र या आंदोलनाकडे सरकारने दुर्लक्ष केले आहे. सरकारने अधिवेशनाच्या सुरुवातीला आमच्या मागण्या मान्य न केल्यास आत्मदहन करण्याचा निणऱ्य आंदोलकर्त्यींनी घेतला असल्याची माहिती राहुल खैरनार यांनी दिली आहे.

## काँग्रेसने गांधी घराण्याबाहेरचे १५ अध्यक्ष दिले: काँग्रेसचा मोदीवर पलटवार

**नवी दिल्ली-** पंडित जवाहरलाल नेहरूंमुळे चहावाला पंतप्रधान झाल्याचे सांगणाऱ्या काँग्रेसने गांधी घराण्याबाहेरचा एकतरी अध्यक्ष करून दाखवावाच, असे आव्हान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी काँग्रेसला दिले होते. त्यावर काँग्रेसने पलटवार केला आहे. पक्षाने आतापर्यंत नेहरू- गांधी घराण्याबाहेरचे १५ अध्यक्ष दिले आहेत, असे उत्तर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांनी दिले आहे. चिदंबरम यांनी या अध्यक्षांची नावेच ट्विट केली आहेत.

चिदंबरम यांनी एकापाठोपाठ एक असे तीन ट्विट करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या टीकेला उत्तर दिले. त्यानंतर त्यांनी राफेल डील, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर उत्तर देण्याचे आव्हान मोदी यांना दिले आहे. 'मोदींना माहीत असावे म्हणून गांधी घराण्याशी संबंधित नसलेल्या काँग्रेसच्या अध्यक्षांची नावे देत आहे. १९४७ नंतर आचार्य कृपलानी, पट्टाभी सीतारमैय्या, पुरुषोत्तमदास टंडन, यू. एन. धेबर, संजीव रेड्डी, संजीवैय्या, कामराज, निजलिंगप्पा, सी. सुब्रमण्यम, जगजीवन राम, शंकरदयाळ शर्मा, डी. के. बरुआ, ब्रम्हानंद रेड्डी, पी. व्ही. नरसिंहराव आणि सीताराम केसरी हे काँग्रेसचे अध्यक्ष झाले आहेत,' असे सांगतानाच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लाल बहादूर शास्त्री, के. कामराज आणि मनमोहन सिंग यांच्यासारख्या कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या आणि देशासाठी मोठे योगदान देणाऱ्या नेत्यांचाही आम्हाला अभिमान आहे,' असे वक्तव्य चिदंबरम यांनी केले आहे. 'काँग्रेसच्या अध्यक्षपदी कुणाला नियुक्त करण्यात आले याची चिंता व्यक्त केल्याबद्दल मोदींचे आभार.



यावरून पंतप्रधान मोदींकडे या विषयावर चर्चा करण्यासाठी बराच वेळ असल्याचे दिसून येते असेही पी. चिदंबरम यांनी म्हटले आहे. आंध्र प्रदेश सरकारने सीबीआय संदर्भात जारी केलेला आदेश गंभीर असून मोदी सरकारने देशातील सर्वोच्च तपास यंत्रणा सीबीआयला 'प्रायव्हेट आर्मी' बनवल्याची गंभीर आरोप काँग्रेस नेते पवन खेडा यांनी केला आहे. दरम्यान, पश्चिम बंगाल सरकारने सीबीआयला राज्यात छापेमारीसाठी तसेच तपासासाठी देण्यात आलेली सामान्य परवानगी शुक्रवारी मागे घेतली. गेल्या साडेचार वर्षांत देशातील संस्थांची आपण काय परिस्थिती करुन ठेवली आहे, याचा मोदी सरकारने अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. जर यात सुधारणा झाली नाही, तर देशासाठी हा मोठा धोका असल्याचेही खेडा म्हणाले.

## २० डिसेंबरला निवासी डॉक्टर्सकडून रास्ता रोको आंदोलन

**मुंबई -** आपल्या प्रलंबित मागण्यांबाबत सरकार दरबारी सकारात्मक विचार होत नसल्याचा आरोप करत राज्यातील सरकारी महाविद्यालयातील मार्ड या निवासी डॉक्टरांच्या संघटनेने २० डिसेंबरला राज्यभरात रास्ता रोको आंदोलन पुकारले आहे. याबाबत नाराजी दर्शवण्यासाठी मार्डने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून रास्ता रोकोबाबत पूर्वकल्पना दिली आहे.

औरंगाबाद आणि जेजे रुग्णालयातील निवासी डॉक्टरांवर झालेला हल्ला, रुग्णांच्या नातेवाइकांसाठी पासची सोय, डॉक्टरांवर हल्ला झाल्यास तत्काळ माहिती मिळण्यासाठी सरकारी रुग्णालयात अलार्म सिस्टीम, उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे निवासी डॉक्टरांविरोधातील हल्ल्यांविरोधातील चौकशीसाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना



करणे याबाबत अद्यापही वैद्यकीय शिक्षण व संशोधन (डीएमईआर) ने निर्णय घेतलेला नाही. महिला निवासी डॉक्टरांची प्रसूती रजा, क्षयरोगाच्या उपचारांसाठी रजा, स्टायपनमध्ये वाढ याबाबत अद्यापही सक्षम निर्णय झालेला नसल्याची तक्रारही मार्डने मुख्यमंत्र्यांना केली आहे.

वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या पदवीधर विद्यार्थ्यांना अद्यापही बंधपात्रता प्रक्रिया अद्यापही ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध झालेली नाही. या प्रक्रियेतील त्रुटीही मार्डने मुख्यमंत्र्यांसमोर मांडल्या आहेत. वैद्यकीय रुग्णालयांतील औषधे व साहित्यांच्या तुटवड्यावर काम करण्यासाठी ऑडिट समितीची स्थापना करणे, सरकारी रुग्णालयांत चोवीस तास निवासी डॉक्टरांसाठी उपाहारगृहांची सोय करणे आदी मागण्याही मार्डने केल्या आहेत.

## राममंदिर न झाल्यास देशात बंडाळी- रामदेवबाबा

**हरिद्वार –** अयोध्येत राम मंदिर उभारण्याचा प्रश्न कोर्टातून नव्हे, तर संसदेतूनच सुटेल. त्यासाठी संसदेवर दबाव टाकला जात आहे', असे सांगतानाच कोर्ट आणि संसदेने राम मंदिर उभारले नाही, तर देशात बंडाळी माजू शकते', असा इशारा योगगुरू बाबा रामदेव यांनी दिला आहे.

हरिद्वारमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी मतदान करण्याकरता आले असता रामदेवबाबा यांनी हा इशारा दिला. या वेळी त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी बालकृष्णही उपस्थित होते. या वेळी त्यांनी राम मंदिराचा प्रश्न संसदेतूनच मार्गी लागेल, असे सांगितले. या आधीही रामदेवबाबांनी राम मंदिराची उभारणी न झाल्यास



देशातील सामाजिक वातावरण बिघडेल आणि त्यामुळे सामाजिक तेढ निर्माण होईल, असा इशारा दिला होता. आता नाही तर कधी नाही, या विचारातून राम मंदिराच्या प्रश्नावर काम केले पाहिजे, असे रामदेवबाबा म्हणाले होते. राम मंदिराचा प्रश्न तडजोडीने सुटण्याची वेळ निघून गेली आहे. त्यामुळे संसदेत कायदा बनवून मंदिराचा प्रश्न सोडवण्यात आला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले होते. या पार्श्वभूमीवर रामदेव बाबांनी हा इशारा दिला आहे.

## फोन 'स्वीच ऑफ' करण्यापूर्वी सावधान, तुमचे बँक अकाऊंट आहे धोक्यात

**नवी दिल्ली -** सध्या डिजिटल व्यवहारांमुळे स्मार्टफोन काळजीपूर्वक हाताळणे आवश्यक बनले आहे. कारण, अज्ञातांकडून किंवा कंपनीच्या नावे फोन करुन तुमची फसवणूक होऊ शकते. नुकतेच, काही दिवसांपूर्वी पुण्यातील एका नागरिकाला असाच गंडा घालण्यात आला आहे. संबंधित व्यक्तीने आपला मोबाईल बंद करताच, त्याच्या बँक अकाऊंटमधून ९३ हजार रुपये काढण्यात आले होते. त्यामुळे अशा सूचनांचे




पालन करण्यापूर्वी तुम्ही सावधान असणे गरजेचं आहे.

हॅकर्सकडून टेलिकॉम कंपनीचे कर्मचारी असल्याची बतावणी करुन तुमची फसवणूक करण्यात येत आहे. कॉल ड्रॉपिंगची समस्या आणि इंटरनेट स्पीडच्या तक्रारीबद्दल विचारणा करुन चलाखीने त्यांना हवी ती माहिती तुमच्याकडून काढून घेतात. तुमच्या सीमकार्डचा वीस अंकी नंबर मिळवून त्यानंतर तुम्हाला १ अंक दाबायला सांगतात. त्यानंतर तुमचे ऑथेन्टिकेशन समोरच्या व्यक्तीला मिळते. त्यामुळे तुम्हाला येणारे सर्व मेसेज हॅकर्सच्या मोबाईलवर पोहोचतात.

हॅकर्सना तुमच्या मोबाईलमधील सीम स्वॅपिंगसाठी ४ तासांचा कालावधी लागतो. म्हणून हॅकर्सकडून सातत्याने फोन करुन तुम्हाला त्रास देऊन माहिती विचारण्यात येते. त्यामुळे तुम्ही त्रस्त होऊन फोन बंद करता आणि हॅकर्स सहजपणे त्यांचा डाव साधतात. त्यामुळे हॅकर्सच्या सूचनेनंतर कधीही फोन बंद करु नका.

## दुष्काळाचे संकट गडद; उपाययोजना करा -शरद पवार



**मुंबई-** राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळाचे गांभिर्य लक्षात घेवून राज्य सरकारने निश्चित कृती कार्यक्रम हाती घ्यावा आणि वेळीच पाऊले उचलून जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी करणारे पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासदार शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांना दिले आहे. त्यासोबत दुष्काळी संकटाशी सामना करण्यासाठी लागणाऱ्या उपाययोजनांची टिप्पणीही त्यांनी पाठवली आहे. महाराष्ट्राच्या बहुतांश भागात पर्जन्यमान कमी झाल्याने ऐन हिवाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. दुष्काळाचे दुर्भिक्ष जाणवू लागले आहे. विशेषत: परतीच्या पावसाने निराशा केल्याने खरीपाचे पीक हातचे गेले असून रब्बी पिकांची पेरणी संकटात आली आहे. पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्यांच्या टंचाईमुळे पशूधनही धोक्यात आले आहे. त्यामुळे राज्य सरकारने यावर कृती कार्यक्रम हाती घ्यावा, अशी मागणी शरद पवार यांनी केली आहे.

दुष्काळावर मात करण्यासाठी लागणाऱ्या उपाययोजनांची टिप्पणीही शरद पवार यांनी पत्रासोबत जोडली असून मुख्यमंत्र्यांनी वैयक्तिक लक्ष घालावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## ठाणे ग्रामीण पोलिसांचा दिवाळी स्नेहमिलन 2018 मोठ्या धुम धडाक्यात साजरा








या संपूर्ण रंगारंग कार्यक्रमात ठाणे ग्रामीण पोलिस अधिक्षक डॉ. शिवाजी राठोड यांच्या गायनाने सर्व पोलिस दलाला मंत्रमुग्ध करण्यात आले

दिनांक १४ नोव्हेंबर २०१८ रोजी ठाणे कोर्टयार्ड हॉटेल परिसरात पोलिसांसाठी दिवाळी स्नेह संमेलन २०१८ हा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे विशेष पोलिस महा निरीक्षक नवल बजाज उपस्थित होते. यावेळी हजारोंच्या संख्येने पोलिस दलातील कार्यरत अधिकारी व त्यांचे कुटुंब यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रम मोठ्या थाटात पार पाडण्याचे सर्व श्रेय ठाणे ग्रामीण पोलिस अधिक्षक डॉ. शिवाजी राठोड यांना देण्यात आले. जमलेल्या श्रोतेगणांनी वारंवार राठोड यांना गाण्यासाठी आवाज दिला. पोलिस सेवेत उच्चपदावर कार्यरत असलेले शिवाजी राठोड यांनी अतिशय सुरेल आवाजात मराठी व हिंदी गाणी गाऊन आपल्यातला गायक कलाकार म्हणून संपूर्ण पोलिस दलाला नवीन ओळख दिली. यावेळी कार्यक्रमामध्ये क्राईम पेट्रोल या टी व्ही सिरीयलच्या कलाकारांना पोलिस अधिक्षक शिवाजी राठोड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. अतिशय शिस्तबद्ध हा कार्यक्रम नियमांचे पालन करुन सादर करण्यात आला.

## 'ठाकरे' चित्रपटाचा सिक्वेल येणार - संजय राऊत

**मुंबई-** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा जीवनपट असलेल्या 'ठाकरे' सिनेमाचा सिक्वेल येणार असल्याची माहिती शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी दिली आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या सहाव्या स्मृतीदिनानिमित्त त्यांनी एबीपी माझाच्या 'ब्रेकफास्ट न्यूज'मध्ये अनेक आठवणींना उजाळा दिला. नवाजुद्दीन सिद्दीकीची प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाचं दिग्दर्शन अभिजीत पानसे यांनी केलं आहे.

बाळासाहेबांचं व्यक्तिमत्त्व पुढच्या पीढीसाठी मोठ्या पडद्यावर यावं असं मला वाटलं. आधी 'बाळकडू' नावाचा सिनेमा आम्ही आणला होता. आता 'ठाकरे' या चित्रपटाची निर्मिती करतोय, जो मराठी आणि हिंदी भाषेत आहे. दोन तास १० मिनिटांचा हा पहिला भाग आहे. त्याचा सिक्वेल सुद्धा येणार आहे. सिनेमाच्या पहिल्या भागात १९९५ पर्यंतचा बाळासाहेबांचा जीवनपट दाखवणार आहे. या सिनेमात बाळासाहेबांची भूमिका नवाजुद्दीन सिद्दीकी करतोय. त्यानेही या सिनेमासाठी अभ्यास केला. २३ जानेवारी २०१९ रोजी ३००० स्क्रीनवर या सिनेमाचा वर्ल्ड टेलीव्हिजन प्रीमियर आहे, असं संजय राऊत म्हणाले.

'मी ३० वर्षांपेक्षा जास्त काळ बाळासाहेबांच्या संपर्कात होतो. 'सामना'चा संपादक म्हणून त्यांचा जवळून सहवास लाभला.



बाळासाहेबांचं व्यक्तिमत्त्व लार्जर दॅन लाईफ आहे. त्यांच्यासारखं व्यक्तिमत्त्व शतकातून एकदाच होतं. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर भारतात किंवा महाराष्ट्रात जर मोठं व्यक्तिमत्त्व निर्माण झालं असेल ते शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे.

## मुंबईच्या खड्ड्यांना वर्ल्ड रेकॉर्डस इंडिया बुकचे 'गोल्ड मेडल'

**मुंबई-** मुंबईतील खड्ड्यांनी मुंबईकर त्रस्त झाले असले तरी या खड्ड्यांना एक अनोखा बहुमान प्राप्त झाला आहे. मुंबईच्या खड्ड्यांना वर्ल्ड रेकॉर्डस इंडिया बुकचे 'गोल्ड मेडल' मिळाले असून याबाबतचे प्रमाणपत्र, सुवर्ण पदक व गोल्डन फ्रेम 'वर्ल्ड रेकॉर्ड बुक' कडून प्राप्त झाले आहे. मात्र गिनिज रेकॉर्ड बुक आणि लिम्का रेकॉर्ड बुकने ही नोंद करण्यास नकार दिला आहे. मुंबईतील रिपाइं (ए) रोजगार आघाडी महाराष्ट्र सरचिटणीस नवीन लादे यांनी सुरू केलेल्या 'मुंबईचे खड्डे वर्ल्ड बुकांमध्ये' या अभियानाची नोंद वर्ल्ड रेकॉर्डस् इंडिया बुकमध्ये झाली आहे. पावसाळ्यात मुंबईतील रस्त्यांवर पडणाऱ्या खड्ड्यांमुळे होणारा त्रास, अपघात आणि समस्या यावर उपाय म्हणून लादे यांनी मुंबईतील खड्ड्यांची आकडेवारी मोजण्यासाठी मुंबईकरांना खड्ड्यांची छायाचित्रे पाठविण्याचे आवाहन १७ जुलै २०१८ रोजी केले होते. या आव्हानासोबत अनेक मुंबईकरांनी जागोजागी असणाऱ्या खड्ड्यांची छायाचित्रे mumbaipotholes.com या संकेतस्थळावर पाठवली. यामुळे मुंबईच्या रस्त्यांवरील खड्ड्यांची आकडेवारी ३८ दिवसांत समोर आली. आता या खड्ड्यांच्या आकडेवारीची वर्ल्ड रेकॉर्ड बुक मध्ये नोंद झाली आहे. या संकेतस्थळावर खड्ड्यांची आकडेवारी २६,९३४ एवढी नोंदवली गेली.




आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)